“हिंगोली जिल्हयातील नगर परिषदांच्या आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास (सन २००२-०३ ते २०१२-१३)”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

विष्णुपूरी, नांदेड-४३१६०६, महाराष्ट्र राज्य

अंतर्गत सामाजीक शास्त्र विद्याशाखेतील अर्थशास्त्र विषयाच्या विद्यावाचस्पती
(पीएच.डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणारा

शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक विद्यार्थी
गजानन संभाजीराव देशमाने

मार्गदर्शक
प्राचार्य, डॉ.जे.एस. भोयर
कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय,
हिंगोली - ४३१ ५१३

२०१४-२०१५

प्रस्तावना :

लोकशाही शासनव्यवस्थेत स्थानिक स्वराज्य संस्थांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आधुनिक काळात सर्व देशामध्ये ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था हया ग्रामीण पातळीवरील जनतेला स्थानिक सेवा उपलब्ध करुन देतात तर नागरी स्थानिक स्वराज्य संस्था शहरातील जनतेच्या सोईविषयी सर्व प्रकारची काळजी घेणारे व जनतेच्या प्रतिनिधीमार्फत कारभार चालविणारे प्रशासन होय. स्वातंत्र्यानंतर भारताने लिखीत राज्यघटनेचा त्याचबरोबर संघराज्य शासन पध्दतीचा स्विकार केला. संघराज्य शासन पध्दतीमध्ये केंद्र व राज्य अशी दोन सरकारे अस्तित्वात येतात. त्यांच्यात अधिकार व कार्याची वाटणी केली जाते. स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय राज्य सरकारच्या (राज्यसुची) सूचित देण्यात आला. त्यानुसार नगर परिषदांची निर्मिती करण्याचा अधिकार राज्य सरकारला असतो. आज शहरी समाजाच्या दृष्टीने नगर प्रशासनाची भूमिकाही महत्त्वाची आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९५६ साली राज्याची पूर्नरचना करण्यात आली. १ ते १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर नगर परिषदांच्या निर्मितीसाठी १९६५ साली महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक नागरी अधिनियम तयार करण्यात आला. व महाराष्ट्रातील मध्यम स्वरुपाच्या नगरांसाठी नगर परिषदांची निर्मिती करण्याची तरतूद करण्यात आली.

ज्या स्थानिक क्षेत्रासाठी नगर परिषदांची निर्मिती करावयाची आहे. त्या स्थानिक नगराची लोकसंख्या कमीत कमी २५,००० असावी लागते. तसेच कृषी व्यतिरिक्त रोजगाराची टक्केवारी ३५% पेक्षा जास्त असावी लागते. असे निकष ज्या नगरासाठी लागु पडतील त्या नगरासाठी महाराष्ट्र राज्य सरकार नगर परिषदेची निर्मिती करु शकते.

महाराष्ट्रात २२९ नगर परिषदा आहेत. त्यांचे अ ब व क अशा तीन वर्गात वर्गीकरण केलेले आहे. त्यापैकी अ वर्ग नगर परिषदा १८, ब वर्ग ४७ व क वर्ग १६३ नगर परिषदा आहेत. मराठवाडा एक प्रशासकीय विभाग असून त्यामध्ये एकूण ८ जिल्हे व ७४ तालुके आहेत. मराठवाडयात एकूण नगर परिषदा ५२ आहेत. नागरी स्थानिक स्वराज्य संस्था हया नगरविकास मंत्रालयाच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली कार्य करतात. शैक्षणिक सुविधा, आरोग्य विषयक, दळण-वळण व वाहतुक इ. सोईमुळे नगरांचा विस्तार वाढत आहे. पर्यायाने नागरी समस्या देखील वाढत आहेत. नागरी समस्या सोडविण्याचे कामही प्रशासन करते. स्थानिक स्वराज्य संस्थांचे मूल्यमापन करण्यासाठी विविध समित्या स्थापन

केल्या नंतर १९९३ साली ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती करुन स्थानिक स्वराज्य संस्थांना वैधानिक आधार प्राप्त करुन दिला.

परभणी जिल्हयाचे विभाजन होवून हिंगोली जिल्हयाची निर्मिती १ मे १९९९ साली करण्यात आली. हिंगोली जिल्हयाचे क्षेत्रफळ ४५७४ चौ.कि.मी. असून हिंगोली, कळमनुरी, वसमत, औंढा (नागनाथ) व सेनगांव असे पाच तालुके असून तीन नगर परिषदा हिंगोली, कळमनुरी व वसमत येथे आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था :
अर्थ व व्याख्या :

जगातील बहुतांश देशात वेगवेगळया प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. या संस्था वेगवेगळया देशांत वेगवेगळया नावाने ओळखल्या जातात. जसे फ्रान्स व ब्रिटनमध्ये स्थानिक शासन (लोकल गव्हर्नमेंट) तर भारतात या संस्थांना स्थानिक स्वराज्य संस्था (लोकल सेल्फ गव्हर्नमेंट) म्हटले जाते.

१. एनसायक्लोपिडीया ऑफ ब्रिटानिका च्या मते,

"स्थानिक स्वशासन म्हणजे पूर्ण राज्याऐवजी अंतर्गत दृष्टया प्रबंधित आणि लहान क्षेत्रात निर्णय घेवून कार्यान्वित करणारी संस्था म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय."

२. एन. गोल्डिंगच्या मते,

"स्थानिक शासन म्हणजे स्थानिक लोकांनी स्वत: त्यांच्या प्रश्नांची व्यवस्था करणे होय."

नगर परिषदेचा कार्यकाळ :

नगर परिषदेचा कार्यकाळ ५ वर्षाचा असतो राज्य सरकार नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ कलम ३१३ अन्वये कार्यकाळ संपण्यापुर्वी सुध्दा विसर्जित करु शकते. नगर परिषद कार्यकाळ संपण्यापुर्वी विसर्जित केली असेल तर ६ महिन्याच्या आत नगर परिषदेची निवडणूक घेतली पाहिजे. असे ७४ व्या घटनादुरुस्ती अधिनियमाने बंधनकारक केले आहे.

अध्ययन विषयाची निवड :

वाढत्या नागरीकरणाने प्रशासनाच्या जबाबदारीत वाढ झाली आहे. परंतु शहरी लोकांना सुविधा पूरविण्यासाठी वित्तीय स्त्रोतांची कमतरता असल्याने नगर परिषदांच्या कार्यामध्ये एकसुत्रीपणा येत नाही. हिंगोली जिल्हयात तीन नगर परिषदा असून अनुदानाचे स्वरुप ही भिन्न आहे.

हिंगोली जिल्हयात तीनही नगर परिषदांची आर्थिक स्थिती कशी आहे ? जिल्हयात कार्यरत असणाऱ्या नगर परिषदांचे उत्पन्न, खर्च, अनुदान, वार्षिक, अंदाजपत्रक, पालिकांचे प्रश्न इ. बाबींचा अभ्यास करण्यासाठी मी हिंगोली जिल्हयातील नगर परिषदेच्या आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास (सन २००२-०३ ते २०१२-१३) या विषयाची निवड केली आहे.

अध्ययन विषयाची उदिष्टये :

१. हिंगोली जिल्हयातील नगर परिषदांच्या उत्पन्नाचा अभ्यास करणे.

२. नगर परिषदांच्य समस्यांचा अभ्यास करणे.

३. हिंगोली जिल्हयातील नगर परिषदांनी केलेल्या खर्चाचा अभ्यास करणे.

४. तीनही नगर परिषदांच्या वित्तीय स्थितीचा अभ्यास करणे.

५. आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना सूचविणे.

अध्ययनाची गृहितके (Hypothesis) :

१. नगर परिषदांच्या खर्चामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.

२. नगर प्रशासनात नगर परिषदांची भूमिका महत्त्वाची आहे.

३. कर रुपाने नगर परिषदांना उत्पन्न मिळते.

४. सरकारी अनुदानावर नगर परिषदा अवलंबून आहे.

५. नगर परिषदांचा खर्च उत्पन्नापेक्षा अधिक आहे.

संशोधनाची पध्दती (अध्ययन पध्दती) :

अध्ययन विषयासाठी दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात येईल.

१. तीनही नगर परिषदांच्या वार्षिक अंदाजपत्रकाचा आधार घेतला जाईल.

२. नगर पालिका प्रशासनावरील ग्रंथ व संशोधन प्रबंधाचा आधार घेण्यात येईल.

३. मंत्रालयीन आकडेवारी.

४. कोष्टके आलेख, पायचार्ट इ. चा वापर.

५. जिल्हाचे संकेतस्थळ

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम आकडेवारीचा अधिक वापर केला जाईल.

अध्ययन प्रकरणाची रुपरेषा :

प्रकरण १ : प्रस्तावना

अध्ययन विषयाच्या प्रस्तावनेशी निगडीत प्रकरण.

प्रकरण २ : नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा ऐतिहासिक आढावा.

इतिहास, पंचायत राज्याची सुरुवात, अभ्यासगट, समित्या व त्यांच्या शिफारशी ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती इ. अभ्यास.

प्रकरण ३ : हिंगोली जिल्हा : पार्श्वभूमी

जिल्हाची निर्मिती, भौगोलिक स्थान व क्षेत्रफळ, नद्या लोकसंख्या विषयक वैशिष्टये, हवामान, पीके इ. अभ्यास.

प्रकरण ४ : नगर परिषदांचे उत्पन्न

मालमत्ता कर, इतर कर, शासकीय अनुदाने, वर्गणी व इतर बाबींपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण ५ : **नगर परिषदांचा खर्च**

सार्व. बांधकाम, पाणीपुरवठा, आरोग्य, सार्व. सोईसुविधा वरील खर्च तसेच इतर बाबींवर केलेल्या खर्चाचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण ६ : **हिंगोली जिल्हयातील नगर परिषदांच्या उत्पन्न व खर्चाची तुलनात्मक अभ्यास.**

जिल्हयात ५ तालुके असून ३ नगर परिषदा आहेत या नगर परिषदांच्या उत्पन्न व खर्चाचा तुलनात्मक अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण ७ : **निष्कर्ष व शिफारशी**

संदर्भ ग्रंथ सूची :

याप्रमाणे अभ्यास विषयाची मांडणी करण्यात येईल.

संदर्भ :

१. डॉ. प्रदिप आगलावे - संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे.

२. अर्जुनराव दर्शनकार - पंचायत राज व नागरी प्रकाशन.

३. डॉ. टी.एन.गायकवाड - महाराष्ट्रातील स्थानिक स्वशासन.

४. प्रा.व.श.जोशी - महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९९५.

५. अ. ना. कुलकर्णी - भारतातील स्थानिक स्वशासन

संकेत स्थळ/ पाहणी अहवाल :

१. महाराष्ट्र शासन संकेतस्थळ.

२. नगर विकास मंत्रालय, संकेतस्थळ.

३. महाराष्ट्र राज्य आर्थिक पाहणी अहवाल.

४. जिल्हा वार्षिक योजना - जिल्हा नियोजन समिती कार्यालय, हिंगोली.

५. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, म. शा. मुंबई.

संशोधक विद्यार्थी **मार्गदर्शक**

गजानन संभाजीराव देशमाने **प्राचार्य, डॉ.जे.एस. भोयर**

कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, हिंगोली - ४३१ ५१३